ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-II JULY 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची शालेय अभ्यासक्रमांत रूची वाढविणारे नवोपक्रम

**प्रा.डॉ.शैलजा मंडले**
**सहाय्यक प्राध्यापक**
महावीर महाविद्यालय,कोल्हापूर.
मो. ९७६७७३१५२५

## प्रस्तावणा

भारतातील प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. या वृत्तात असे म्हटले आहे की, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करून ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना शाळेची वाट दाखविल्याचे दावे सरकार करीत असले तरी शालाबाहय मुलांच्या संख्येत भारताचा क्रमांक चौथा आहे. तसेच जगात पौगंडावस्थेतील सर्वाधिक शालाबाहय मुलेही भारतातच आहेत युनेस्कोच्याा ताज्या अहवालातून ही बाब समोर आली आहे. सध्या जगात ५ कोटी ३० लाख शाळाबाहय मुले आहेत. वास्तविक पाहता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेने ४५ व्या सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची तरतूद केलेली आहे. सध्या २००९ च्या राईट टू एज्युकेशन नुसार, ‘अन्न, वस्त्र, निवारा व शिक्षण’ हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क झालेला आहे. त्यानुसार कोल्हापूर महानगरपालिकेच्या काही शाळांचा सर्व्हे केला असता असे दिसून आले की, प्राथमिक शिक्षणाची चांगली भौतिक सुविधा असूनही मुले शाळेत येण्यास तयार नसतात किंवा आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यास उत्साही नसतात यांचे कारण त्यांच्या घरातील कौटुंबिक वातावरणामध्ये असलेली शिक्षणाबद्दलची अनास्था, दारिद्रय, पालकांची निरक्षरता इ. कारणे असली तरीही शाळेत या मुलांना टिकवून ठेवण्यासाठी विविध नवोपक्रम शिक्षकांनी राबविणे आवश्यक आहे या अनुषंगाने सदर शोधनिबंधामध्ये विचार केलेला आहे.

## समस्या विधान

**“कोल्हापूर महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांची शालेय अभ्यासक्रमांत रूची वाढविणारे उपक्रम सुचविणे ”**

## उद्दिष्टे –

१. शालेय अभ्यासक्रमांत अभिरूची वाढविणारे कोणते उपक्रम राबविलेजातात याची माहिती घेणे.

२. शालेय अभ्यासक्रमासाठी नविन उपक्रम सुचविणे.

## नमुना निवड

कोल्हापूर महानगरपालिकेच्या चार शाळांची पाहणीसाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली.

## माहिती संकलनाची साधने

शाळांमधील नोंदी, शिक्षक, मुख्याध्यापक, विदयार्थी यांचेकडून मिळालेली माहिती.

१. निरीक्षण — सदर समस्येसाठी शोधनिबंधकाने चार शाळांची पहाणी केली

२. मुलाखत — शोधनिबंधकाने शिक्षक, विदयार्थी व मुख्याध्यापक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या व माहिती मिळवली.

## संकलित माहितीचे अर्थनिर्वचन उद्दिष्टानुसार

उद्दिष्ट क्रमांक १. शालेय अभ्यासक्रमांत अभिरूची वाढविणारे कोणते उपक्रम राबवितात याची माहिती घेणे.

| अ. नं | शाळा | सद्यस्थितीत राबविले जाणारे उपक्रम | उपक्रम राबविण्याचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | हिंद विद्यामंदिर, रूईकर कॉलनी | राष्ट्रीय सण, जयंत्या | १०० टक्के |
| २ | एस्तेर पॅटर्न प्राथमिक शाळा, नागाळा पार्क | माता—पालक संघ | १०० टक्के |
| ३ | म. ज्योतिबा फुले विद्यालय, शाहुपूरी | पारंपारिक माहिती | १०० टक्के |
| ४ | सेठ रूईया स्कूल, रविवार पेठ | अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी जादा तास | १०० के |

१. सद्यपरिस्थितीमध्ये महानगरपालिकेच्या नमुना निवड केलेल्या चार शाळांतील पहाणी नुसार वरील उपक्रम राबविले जातात.

२. शालेय अभ्यासक्रमात विद्यार्थी टिकून राहण्यासाठी कालानुसार नविन उपक्रम सुचविणे.

३. १ ली ते ४ थी चे प्राथमिक शिक्षणात विद्यार्थी पटसंख्येवर टिकण्यासाठी कालानुसार प्रत्येक शिक्षक व मुख्याध्यापक यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांबाबत माहिती घेण्यासाठी व त्याच्यांसाठी एक योजना आखणे गरजेचे आहे. त्यानुसार सरसकट सर्वच शाळांना एकसारखे उपक्रम शिक्षक व मुख्याध्यापकांनी राबवू नयेत. तर त्यासाठी खालीलप्रमाणे योजना करावी.

४.मुख्याध्यापक व शिक्षक यांनी प्रथम आपल्या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रतवारी काढावी.

५.शाळेतील शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक कौटुंबिक वातावरण यांची माहिती घ्यावी.

६.पालकांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घ्यावा.

७.गरजेनुसार स्थल कालपरत्वे जी बाब महत्वाची वाटते तीचा सहभाग करावा.

८.कोणते उपक्रम राबवायचे, त्यांच्यासाठी कोणत्या गोष्टी करायच्या, त्याचा कालावधी यांचा एक कृती आराखडा आखून संबंधित शिक्षकाची कार्यविभागणी करायची त्यानुसार योजना बनवायची.

**वरीलप्रमाणे वर्षभराचा एक कृती आराखडा बनवून शिक्षकांनी आपल्या सर्जनशीलतेचा वापर करून विविध नवोपक्रम राबवावेत जसे**

| **स्वच्छतेचे उपक्रम** | **अभ्यासाचे उपक्रम** | **मूल्यशिक्षण उपक्रम** |
| --- | --- | --- |
| रोज आपली शारीरिक स्वच्छता करणे | वाचनाची सवय लावणे | रोज प्रार्थना म्हणणे |
| आपला हातरूमाल, आपले चप्पल, दप्तर स्वच्छ ठेवणे | शुद्ध बोलणे, शुद्ध लिहणे. | ॐ कार म्हणणे, योगासन करणे |
| आपले कपडे स्वच्छ ठेवणे | रोज अभ्यास करणे | व्यायाम करणे. |
| स्वच्छ सुंदर राहणाऱ्यास किताब प्रदान करणे | दैनंदिनी लिहून आज आपण अभ्यास किती वेळा केला याची नोंद ठेवणे | खोटे बोलणे टाळणे. |
| वर्गसफाईचा उपक्रम | रोज गणिते सोडविणे | प्रामाणिकपणा वाढविणारे उपक्रम |
| चप्पल सरळ रेषेत ठेवणे | पाढे पाठ करणे | कोणतेही काम प्रामाणिकपणे करणारे उपक्रम |
| डबे खाताना डब्याखाली कागद घेणे | मोठया आवाजात धडे वाचणे | सहकार्य वाढविणारे उपक्रम |
| प्रत्येक वर्गातील सर्व भौतिक सोयी स्वच्छ ठेवणे | कविता चालीवर म्हणणे. | मदत करण्याची भावना वाढविणारे उपक्रम |
| प्रत्येकाने आपल्या वहया, पेन इ. शालेय साहित्य टापटिप ठेवणे. | अवघड शब्दांचे अर्थ डिक्शनरीत शोधणे. | पाणी वाचवा उपक्रम |
| खोकताना , शिंकताना रूमाल नाकासमोर धरणे | इंग्रजी – मराठी शब्दांचा संग्रह वाढविणे | पर्यावरणावर आधारित उपक्रम |
| | मुलांना इतिहास विषयातील कठिणपणा घालविण्यासाठी कृल्प्त्या देणे. | |

## समारोप

वरीलप्रमाणे सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांनी आपल्या शाळेतील विदयार्थ्यांना आवश्यक अशा गोष्टीसाठी नविन उपक्रम शोधून काढावेत व त्याची कार्यवाही करावी व देशाचे भावी नागरीक घडवावेत. शिक्षण मंडळ व शासन यांनी अशा नवोपक्रमशील शिक्षकांच्या योजनांचे स्वागत करावे. ठराविक साच्यातच एखादी गोष्ट पाहिजे हा आग्रह सोडून दयावा म्हणजे विद्यार्थ्यांना जे पाहिजे ते जर दिले तर शालेय अभ्यासक्रमात नक्कीच अभिरूची वाढेल व शालाबाहय विद्यार्थ्यांचे प्रमाण घटेल हे निश्चित!

## संदर्भ

१. प्राथमिक शालेय शिक्षणातील नापासी व गळती. ले. वा. ना. देशपांडे

२. इच्छाशक्तीचा अभाव– दै. लोकमतमधून प्रकाशित, ले. डॉ. प्र. ल. गावडे(मंथन पुरवणी)दि. १३ जुलै २०१४